## नियमित दिवाणी अपील क्र. १०२/२०१६

## निशाणी २२ वरील आदेश

अपीलार्थी क्र. २ याने प्रस्तुतचा अर्ज उत्तरार्थी क्र. १० भदू आना गवस यांचे वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळावा यासाठी केलेला आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. १० यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणे आवश्यक असल्याबाबत अपिलार्थी यांना माहिती नव्हती, त्यामुळे वारस अभिलेखावर आणण्यासाठी ५ वर्षे ७ महिने २१ दिवसांचा विलंब झाला. वारस सामील न केल्यास अपिलार्थींचे कधीही भरुन न येणारे अपरिमित नुकसान होईल सबब न्यायाचे कारणे अर्ज मंजूर करावा.

०२. उत्तरवादी क्र. १–अ यांनी अर्जाच्याकामी म्हणणे दिलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज ब–याच विलंबाने केलेला आहे त्यामुळे तो नामंजूर करावा.

०३. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अपील सावंतवाडी येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२००९ चे कामी पारीत केलेल्या हुकुमनाम्याविरुध्द केलेले आहे. दावा वाटपाद्वारे कब्जा मिळण्यासाठी करण्यात आलेला होता. दावा मंजूर करण्यात आलेला असून दावा मिळकतीत वादींना १/३ हिस्सा ठरविण्यात आलेला आहे. प्रतिवादीने या आदेशाविरुध्द प्रतिवादीपैंकी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अपील दाखल केलेल आहे.

०४. उत्तरवादी क्र. १० अपील प्रलंबित असताना दि. ३०/०४/२०१२ रोजी मयत झालेला आहे. दाव्याचा निर्णय होण्यापूर्वीच उत्तरवादी क्र. १० मयत झालेला होता. तत्कालिन वादींनी त्याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक

होते. दावा वाटपाचा असल्याने त्याच्या वारसांना दावा मिळकतीत त्याचे हक्क प्राप्त झालेले असून अपीलकारास त्यांना अपीलाचे कामी समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

०५. उत्तरवादी क्र. १० चे वारस मुदतीत अभिलेखावर आणण्यास विलंब झालेला आहे, परंतु केवळ विलंब झाला म्हणून त्याचे वारस अभिलेखावर आणण्याची संधी अपीलकारास नाकारणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुध्द होणार आहे. अपीलाच्या गुणदोषावरील निर्णयाकरीता उत्तरवादी क्र. १० याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

न्यायाचेकारणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2020.02.05 15:55:41 +05'30'

ठिकाण: ओरोस. (वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश १
दिनांक: ०५/०२/२०२०. **सिंधुदुर्ग—ओरोस.**

## नियमित दिवाणी अपील क्र. १०२/२०१६

### निशाणी २३ वरील आदेश

अपीलकाराने प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. १० चे विरुध्द अपील रद्द करण्यात आल्याचा आदेश रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. १० याचे वारस अभिलेखावर दाखल करण्यास विलंब झाला. त्यामुळे उत्तरवादी क्र. १० विरुध्द अबेटमेंट झालेली आहे. अबेटमेंट रद्द न झाल्यास अपीलकार याच्यावर अन्याय होणार आहे. सबब अर्ज मंजूर करावा.

०२. उत्तरवादीतर्फे अर्जाच्याकामी म्हणणे देण्यात आलेले असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अपील सावंतवाडी येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२००९ चे कामी पारीत केलेल्या हुकुमनाम्याविरुध्द केलेले आहे. दावा वाटपाद्वारे कब्जा मिळण्यासाठी करण्यात आलेला होता. दावा मंजूर करण्यात आलेला असून दावा मिळकतीत वादींना १/३ हिस्सा ठरविण्यात आलेला आहे. प्रतिवादीने या आदेशाविरुध्द प्रतिवादीपैंकी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अपील दाखल केलेल आहे.

०४. उत्तरवादी क्र. १० अपील प्रलंबित असताना दि. ३०/०४/२०१२ रोजी मयत झालेला आहे. दाव्याचा निर्णय होण्यापूर्वीच उत्तरवादी क्र. १० मयत झालेला होता. तत्कालिन वादींनी त्याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. दावा वाटपाचा असल्याने त्याच्या वारसांना दावा मिळकतीत त्याचे हक्क प्राप्त झालेले असून अपीलकारास त्यांना अपीलाचे कामी समाविष्ठ करणे

आवश्यक आहे.

०५. उत्तरवादी क्र. १० चे वारस मुदतीत अभिलेखावर न आणल्याने अपील अबेट झालेले आहे. वारस आणण्यास झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता उत्तरवादी क्र. १० चे वारस अभिलेखावर आणण्याची संधी अपीलकारास नाकारणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुध्द होणार आहे. अपीलाच्या गुणदोषावरील निर्णयाकरीता उत्तरवादी क्र. १० याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

न्यायाचेकारणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2020.02.05 15:56:45 +05'30'

ठिकाण: ओरोस.

(वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश १
**सिंधुदुर्ग—ओरोस.**

दिनांक: ०५/०२/२०२०.

## नियमित दिवाणी अपील क्र. १०२/२०१६

## निशाणी २४ वरील आदेश

अपीलकाराने प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. १० चे वारस दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अपीलकाराच्या म्हणण्यानुसार उत्तरवादी क्र. १० दाव्याचे कामकाज सुरु असताना सावंतवाडी येथे दि. ३०/०४/२०१२ रोजी मयत झाला आहे. दावा वाटपाचा असल्याने त्याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब व अपील रद्द करण्याचा आदेश रद्द झालेला आहे. उत्तरवादी क्र. १० च्या वारसांना दावा मिळकतीत हक्क प्राप्त होत असल्याने त्यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करावा.

०२. उत्तरवादीतर्फे अर्जाच्याकामी म्हणणे देण्यात आलेले असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे अपील सावंतवाडी येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२००९ चे कामी पारीत केलेल्या हुकुमनाम्याविरुध्द केलेले आहे. दावा वाटपाद्वारे कब्जा मिळण्यासाठी करण्यात आलेला होता. दावा मंजूर करण्यात आलेला असून दावा मिळकतीत वादींना १/३ हिस्सा ठरविण्यात आलेला आहे. प्रतिवादीने या आदेशाविरुध्द प्रतिवादीपैंकी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अपील दाखल केलेल आहे.

०४. उत्तरवादी क्र. १० अपील प्रलंबित असताना दि. ३०/०४/२०१२ रोजी मयत झालेला आहे. दाव्याचा निर्णय होण्यापूर्वीच उत्तरवादी क्र. १० मयत झालेला होता. तत्कालिन वादींनी त्याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक

होते. दावा वाटपाचा असल्याने त्याच्या वारसांना दावा मिळकतीत त्याचे हक्क प्राप्त झालेले असून अपीलकारास त्यांना अपीलाचे कामी समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

०५. उत्तरवादी क्र. १० चे वारसांना दावा मिळकतीत हक्क प्राप्त झालेले असून हुकुमनाम्याच्या पुर्ततेकरीता त्यांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. तसेच अबेंटमेंट चा अर्ज देखील रद्द करण्यात आलेला आहे. अपीलाच्या गुणदोषावरील निर्णयाकरीता उत्तरवादी क्र. १० याचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. न्यायाचेकारणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकाराने मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त अपील मेमो प्रत दाखल करावी.

Digitally signed by Varsharani Abhijit Patravale
Date: 2020.02.05 15:57:11 +05'30'

ठिकाण: ओरोस.

(वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश १
**सिंधुदुर्ग—ओरोस.**

दिनांक: ०५/०२/२०२०.